-: प्रकरण तिसरे :-

# संशोधन समस्या आणि संशोधनाचा आराखडा

## (Research Problem & Research Design)

# ❂ प्रकरण तिसरे ❂

# संशोधन समस्या आणि संशोधनाचा आराखडा

(Research Problem and Research Design)

## १) प्रास्ताविक (Introduction) :-

या प्रकरणात प्रस्तुत अभ्यासासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पद्धतीचे विवेचन करण्यात आले आहे. संशोधन विषयाची निवड, संशोधनसाठी निवडलेली नेमकी समस्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधन क्षेत्र, नमुना निवडीची पद्धत, तथ्य संकलनासाठी वापरलेले तंत्र, तथ्य संकलन, माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण आणि प्रकरणांची रूपरेषा. या संशोधन आराखड्याच्या विविध पैलूंचे विवेचन या प्रकरणात करण्यात आले आहे.

## २) संशोधन विषयाची निवड (Selection of the Research Topic) :-

"सहकारी संस्था आणि स्त्रियांचा विकास : वारणानगरमधील सहकारी संस्थांचा समाजशास्त्रीय अभ्यास" हा प्रस्तूत संशोधनाचा विषय आहे. हा विषय निवडण्याची दोन कारणे आहेत. मी समाजशास्त्र या विषयाचा एम्. ए. स्तरावरील अभ्यास करित असताना "स्त्री आणि समाज" (Women and Society) हा ऐच्छिक विषय (Optional Paper) निवडला होता. या विषयाच्या अभ्यासावरून समाजातील स्त्रियांची स्थिती काय आहे ? विविध क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग कसा वाढत आहे याची जाणीव मला झाली. त्यामुळे स्त्रियांविषयीच्या अभ्यासात माझी अभिरूची निर्माण झाली.

मी वारणानगर जवळील कोडोली गावांत राहतो. वारणानगर हे या परिसरातील सहकाराचे एक प्रमुख केंद्र आहे. या ठिकाणी महिला सहकारी संस्था आहेत. स्त्रियांच्या सहकारी

क्षेत्रामधील सहभागामुळे त्यांचा वैयक्तीक स्वत:चाच विकास होत नसून त्यांच्या आर्थिक, सामाजिक दर्जात परिवर्तन घडून येत आहे. वारणानगरमधील महिला सहकारी संस्थांमुळे, त्यांना मिळालेल्या उद्योग धंद्यामुळे त्यांचे संपूर्ण पूर्वीचे जीवनच बदलून गेले आहे. हे माझ्या निदर्शनात आले.

त्यामुळे प्रस्तुत विषयाचा पद्धतशीर अभ्यास करावा असे मला वाटले. त्यामुळेच मी हा विषय संशोधनसाठी निवडला. साहित्या परिशिलनासाठी (Review of Literature) सदर विषयावर आधीच्या संशोधकांनी काही संशोधन केले आहे का ? या विषयीचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधकाने केला. भारत सरकारच्या स्त्री आणि बालविकास मंत्रालय तसेच मानवी संसाधन-विकास मंत्रालयाने संयुक्तरीत्या प्रकाशित केलेल्या (१९९५ : ५०-५१) अहवालात (Self Employed Women's Association (SEWA)) या स्त्रियांच्या सहकारी संस्थेचा अनुभव या संस्थेच्या उपाध्यक्षा श्रीमती ललिता कृष्णस्वामी यांनी दिला आहे. स्त्रियांसाठी SEWA मार्फत केले जाणारे कार्य या अहवालात आहे. सहकारी संस्था आणि महिलांचा विकास या विशिष्ट विषयावर करण्यात आलेले एकही समाजशास्त्रीय संशोधन प्रस्तुत संशोधकाला आढळले नाही. त्यामुे अन्वेषणात्मक (Exploratory) स्वरूपाचे संशोधन करण्याचे संशोधकाने ठरविले.

## ३) <u>संशोधन समस्या (The Research Problem)</u> :-

"सहकारी संस्था आणि स्त्रियांचा विकास - वारणानगरमधील सहकारी संस्थांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातूनच केलेला एक अभ्यास" असा प्रस्तूत संशोधनाचा विषय आहे.

## ४) <u>संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study)</u> :-

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

१) वारणानगरमधील महिला सहकारी संस्थांचा परिचय करून घेणे.

२) महिला सहकारी संस्थामधील स्त्रियांच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीचे अध्ययन करणे.

३) महिला सहकारी संस्थांमुळे स्त्रियांच्या आर्थिक स्थितीमध्ये झालेल्या परिवर्तनाचे अध्ययन करणे.

४) महिला सहकारी संस्थांमुळे महिलांच्या सामाजिक जीवनात झालेल्या परिवर्तनाचे अध्ययन करणे.

## ५) <u>संशोधन क्षेत्र (Field of Empirical Observation)</u> :-

सदरचे संशोधन करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील वारणानगर हे ठिकाण निवडलेले आहे याची कारणे खालीलप्रमाणे.

अ) वारणानगर हे कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी संस्थांचे एक प्रमुख केंद्र आहे. या ठिकाणी वारणा सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातुन विविध सहकारी संस्था उदयास आल्या आहेत.

ब) वारणानगर या ठिकाणी महिलांच्या सहकारी संस्था आहेत.

क) संशोधक हा वारणानगर जवळील कोडोली या गावचा कायमचा रहिवाशी असल्यामुळे संशोधकास त्या संपूर्ण परिसराची चांगली माहिती आहे.

ड) तसेच येथील सहकारी क्षेत्रातील अनेकांशी संशोधकाच्या ओळखी आहेत. त्यामुळे संशोधनासाठी माहिती संकलित करणे सोयीचे होते.

वरील चार बाबी ध्यानात घेऊन वारणानगर हे अभ्यासक्षेत्र निवडण्यात आले.

## ६) <u>सहकारी संस्थांची निवड (Selection of the Co-operative Institutions)</u> :-

या परिसरातील सर्वच सहकारी संस्थांमुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे महिलांच्या सामाजिक, आर्थिक दर्जात परिवर्तन होत आहे. हे खरे असले तरी प्रस्तुत अभ्यासासाठी केवळ महिला

सहकारी संस्थांची निवड करण्याचे ठरले. त्यानुसार या संशोधनासाठी वारणानगरमधील खालील महिला सहकारी संस्थांची निवड केलेली आहे.

अ) श्री वारणा महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर.

ब) श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर.

क) श्री वारणा महिला सहकारी पतसंस्था लि., वारणानगर.

ड) श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि., वारणानगर (वारणा-बझार).

वरील संस्थांची अभ्यासासाठी निवड करण्याचे कारण असे की, या संस्था प्रामुख्याने महिलांच्या सहकारी संस्था आहेत हे खालील विवेचनावरून स्पष्ट होईल.

१) श्री वारणा महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर या संस्थेत केवळ तीन पुरूष कर्मचारी वगळता सर्व महिला आहेत.

२) श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर या संस्थेत व्यवस्थापन मंडळात तसेच कर्मचारी वर्गात सर्वच महिला आहेत.

३) श्री वारणा महिला पतसंस्थेमध्ये तीन पुरूष कर्मचारी वगळता अन्य सर्व महिला आहेत.

४) श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि., वारणानगर (वारणा बझार) या संस्थेत ८०% महिला सभासद आहेत. त्याचबरोबर कर्मचाऱ्यांमध्ये देखील ८०% पेक्षा जास्त महिला कर्मचारी आहेत.

## ७) उत्तरदात्यांच्या नमुन्याची निवड (Selection of Sample Respondents) :-

सदर संशोधनासाठी महिलांच्या सहकारी संस्थांची निवड केल्यानंतर ज्यांच्याकडून प्राथमिक माहिती संकलित करावयाची होती अशा महिलांची निवड करण्यासाठी खालील पद्धत

वापरली. प्रथम निवडलेल्या महिला सहकारी संस्थांच्या कार्यालयांना भेटी दिल्या. सदर त्या-त्या संस्थेतील स्त्री कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे, या विषयीची माहिती संकलित केली. त्यावरून पुढीलप्रमाणे चित्र स्पष्ट झाले.

**सारणी क्रमांक ३.१**

**वारणानगरमधील महिला सहकारी संस्थेतील एकूण महिला कर्मचाऱ्यांची संस्थेनुसार आकडेवारी**

| अ. नं. | संस्थेचे नांव | महिला कर्मचाऱ्यांची एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | श्री वारणा महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर | ३४१ |
| २ | श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर | २१ |
| ३ | श्री वारणा महिला सहकारी पतसंस्था लि., वारणानगर | ७ |
| ४ | श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि., वारणानगर (वारणा बझार) | ६१ |
| **एकूण** | | ४३० |

अभ्यासासाठी वरील समग्रातुन नमुना निवडायचा होता. वरील सर्व संस्थांमधील महिलांची प्रतिनिधीत्व नमुन्यात असावे असे ठरविण्यात आले. संशोधकाजवळ उपलब्ध असणारी वेळ, श्रम आणि पैसा या स्वरूपातील साधन सामुग्री लक्षात घेऊन सर्व संस्थांमधील १०० महिला उत्तरदात्यांची निवड सहेतुक नमुना निवड (Purposive Sampling), या तंत्राचा अवलंब करून करण्याचे ठरविले. त्यानुसार सहेतुक नमुना निवड पद्धतीने १०० उत्तरदात्यांची निवड केली. खालील सारणीवरून अभ्यासासाठी निवडलेल्या नमुना विषयीचे चित्र स्पष्ट होईल.

## सारणी क्रमांक ३.२

## वारणानगरमधील महिला सहकारी संस्थांमधून अभ्यासासाठी निवडलेल्या महिलांची संस्थावार संख्या व टक्केवारी

| अ. नं. | संस्थेचे नांव | एकूण महिला कर्मचारी | निवडलेल्या नमुन्याचा आकार | एकूण कर्मचाऱ्यांची टक्केवारी | नमुना निवडीचे तंत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री वारणा महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर | ३४१ | ५० | १३.२% | सहेतुक नमुना निवड |
| २ | श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर | २१ | १२ | ५७.१ % | सहेतुक नमुना निवड |
| ३ | श्री वारणा महिला सहकारी पतसंस्था लि., वारणानगर | ७ | ५ | ७१.४ % | सहेतुक नमुना निवड |
| ४ | श्री वारणा विभागस सहकारी ग्राहक मंडळ लि., वारणानगर (वारणा बझार) | ६१ | ३३ | ५४.० % | सहेतुक नमुना निवड |
| एकूण | | ४३० | १०० | | |

### ८) तथ्य संकलनासाठी वापरलेले साधन (Instrument of Data Collection) :-

अभ्यासासाठीची उद्दिष्टे लक्षात घेऊन तथ्य संकलन करण्यासाठी एक मुलाखत अनुसुची तयार करण्यात आली वरीलपैकी प्रत्येक संस्थेतील चार-चार कर्मचाऱ्यांची मुलाखत घेऊन अनुसूचीची पूर्वचाचणी (Pre-Testing) घेण्यात आली. योग्य त्या दुरूस्त्या करून मुलाखत अनुसूचीत कांही बदल करण्यात आले आणि अंतिम मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली.

## ९) <u>तथ्य संकलन (Data Collection)</u> :-

संशोधनासाठी निवडलेल्या नमुन्यातील सर्व महिला संस्थांकडून सदर मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संशोधकाने स्वत: मुलाखती घेऊन माहिती संकलित केलेली आहे. तथ्य संकलनाचे काम १ ऑक्टोबर २००० ते ३० नोव्हेंबर २००० या कालावधीत करण्यात आले.

## १०) <u>माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण (Analysis and Presentation of Data)</u> :-

संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण करून सारण्या तयार करण्यात आल्या. सदर सारणीतील वर्गीकृत माहितीच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

## ११) <u>संशोधनाच्या मर्यादा (Limitations of the Study)</u> :-

१) सदर संशोधन वारणानगरमधील वर उल्लेखिलेल्या चार संस्थांपुरतेच मर्यादित आहे. त्यामुळे संशोधनाचे निष्कर्ष ही तेवढ्यापुरतेच मर्यादित आहेत.

२) नमुना निवडीसाठी सहेतुक नमुना निवड या गैरमान्यता नमुन निवड तंत्राचा अवलंब केला असल्याने नमुना अभ्यास समग्राचे १००% अचुक प्रतिनिधीत्व करणारा आहे असा संशोधकाचा दावा नाही.

३) संशोधनासाठी सर्वेक्षण पेक्षा व्यष्टि अध्ययन पद्धतीचा अवलंब झाला असता तर अधिक चांगले निष्कर्ष मांडता आले असते. पण वेळेअभावी संशोधकाला हे शक्य झाले नाही ही देखील अभ्यासाची मर्यादा म्हणून मांडता येईल.

## १२) <u>प्रकरण नियोजन (Chapterisation Scheme)</u> :-

संकलित केलेल्या माहितीचे अर्थपूर्ण संघटन करून खालील प्रकरणात अहवालाची विभागणी करण्यात आली आहे.

१) प्रस्तावना (Introduction).

२) वारणा सहकारी संकुल : परिचय (Warana Co-operative Complex : An Introduction).

३) संशोधन समस्या आणि संशोधन आराखडा (Research Problem and Research Design).

४) वारणानगरमधील महिला सहकारी संस्थांचा परिचय (Identification of Women's Co-operative Institutions in Warana Nagar).

५) सहकारी संस्था आणि स्त्रियांचा विकास (Co-opertives and Development of Women).

६) सारांश आणि निष्कर्ष (Summary and Conclusion).

# ⁕ संदर्भ ⁕

१) Krishnaswami, Lalita : "Women's Co-operatives : The SEWA Experience" in Country Report, Forth World Conference on Women Bejing, 1995, pp. 50, 51.

⁕⁕⁕⁕⁕